**आदिवासींकरिता नवसंजीवन योजना**
**जिल्हास्तरीय समितीची स्थापना**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-कुपोनि-२००४/प्र.क्र. ८७ /का.८**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १९ जुलै, २००४.**

**वाचा :-** (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०९५/प्र.क्र.६/का.६, दिनांक २२ जून, १९९५

(२) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्र. कुपोनि-२००४/प्र.क्र. ८७/का.८, दिनांक ५ जुलै,२००४.

**प्रस्तावना :-** उच्च न्यायालय, मुंबई यांनी बालमृत्यूच्या संदर्भात विविध वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने स्वतःहून रिट याचिका क्र.५६२९/२००४ दाखल करुन घेतली होती. या याचिकेवर दि.८.७.२००४ रोजी सुनावणी होवून मा. उच्च न्यायालयाने शासनास अल्पकालीन व दिर्घकालीन करावयाच्या उपाययोजनांबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन राज्यात आदिवासी भागात नवसंजीवन योजनेची अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू शासन निर्णय कुपोनि-२००४/प्र.क्र.८७/का.८, दिनांक ५ जुलै,२००४ अधिक्रमित करुन शासन पुढील प्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

**शासन निर्णय** :- आदिवासींच्या आरोग्यात सुधारणा करणे, त्यांना आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, वर्षभर पुरेल एवढा रोजगार उपलब्ध करणे, पिण्याचे शुध्द व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणे, अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करुन पूरक आहार देणे, या सर्व उपाययोजनांव्दारे आदिवासींचे क्रियाशील आयुष्य वाढविणे, याकरिता नवसंजीवन योजना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.-टिएसपी-१०९५/ प्र.क्र.६/का.६, दि. २२ जून, १९९५ अन्वये अंमलात आलेली आहे. सदरहू योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ जिल्हे व त्या जिल्हयातील अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा व मिनीमाडा या क्षेत्रात राबविण्यात येत आहे. नवसंजीवन योजनेबाबत मुख्य अंमलबजावणी अधिकारी म्हणून सदरहू जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांना घोषित केलेले आहे व ते जिल्हयातील इतर संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यावर संनियंत्रण ठेवतील अशी तरतूद वरील शासन निर्णयामध्ये केलेली आहे. आता या शासन निर्णयाव्दारे नवसंजीवन

योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या घटक योजनांचा आढावा घेण्याकरिता पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | उपाध्यक्ष |
| ३ | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ४ | उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) | सदस्य |
| ५ | जिल्हा पुरवठा अधिकारी | सदस्य |
| ६ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बाल कल्याण), जिल्हा परिषद | सदस्य |
| ७ | कार्यकारी अभियंता,(ग्रामीण पाणी पुरवठा), जिल्हा परिषद. | सदस्य |
| ८ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्यस्तर) | सदस्य |
| ९ | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (रस्ते) | सदस्य |
| १० | जिल्हयातील सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ११ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| १२ | जिल्हयातील दोन नामांकित स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख | सदस्य |
| १३ | आदिवासी भागामध्ये कार्यरत असलेले उपवन संरक्षक (Dy.C.F.) | सदस्य |

२. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार जिल्हयातील आरोग्य, आरोग्य शिक्षण, अन्न सुरक्षा इ. क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकित स्वयंसेवी संस्थांपैकी दोन संस्थांची निवड विभागीय आयुक्त हे आरोग्य महासंचालक यांच्या सल्लामसलतीने करतील. त्यानुसार सदर संस्थेचे प्रतिनिधी "मानद सदस्य" म्हणून वरील समितीवर घेण्यात यावेत. कार्यक्रमांच्या यशस्वीतेमध्ये जिल्हास्तरावरील आणि गांवस्तरावरील स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व सामुहिक सहभागाचे महत्व लक्षात घेता स्वयंसेवी संस्थांची निवड करताना अत्यंत काळजी घेण्यात यावी.

३. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार जिल्हा दंडाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे संबंधित विभागाने तयार केलेल्या प्रत्येक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला व्यक्तीशः जबाबदार राहतील. संबंधित अंमलबजावणी यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडून जर कर्तव्यात कसूर झाली तर कसूर करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द जिल्हा दंडाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी/प्रस्तावित करावी व त्यांचेवर योग्य ती शिक्षा, बडतर्फीसह लादावी अथवा प्रस्तावित करावी.

४. सदरहू समितीने दर महिन्यांला नवसंजीवन योजनेचा आढावा घ्यावा व आढावा बैठकीचा अहवाल आदिवासी विकास विभाग व संबंधित विभागांना पाठवावा.

५. आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी हे इतर यंत्रणेतील अधिकाऱ्यांना समितीमध्ये "सदस्य" म्हणून सामावून घेतील.

६. जिल्हाधिकारी यांना या अनुषंगाने तालुका स्तरीय **समिती स्थापन** करण्याबाबत प्राधिकृत करण्यात येत असून या समितीमध्ये देखील आरोग्य, आरोग्य शिक्षण, अन्न सुरक्षा इ. क्षेत्रात गांवपातळीवरील २ नामांकित स्वयंसेवी संस्थांचा समावेश करण्यात यावा.

७. अशासकीय सदस्यांना दैनिक भत्ता व प्रवासभत्ता नियमानुसार देय असेल त्यानुसार अदा करण्याची कार्यवाही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( अ. नि. कुलकर्णी )**
**उप सचिव**

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य
सर्व मंत्री/ राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, महसून व वन विभाग(वने) , मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते), मंत्रालय, मुंबई-३२.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा, नवी मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
महासंचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई

महालेखापाल (लेखा परिक्षा ), मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), नागपूर
महालेखापाल (लेखा परिक्षा ), नागपूर
संचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय,मुंबई
निवड नस्ती (का.८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.